महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2023/6036

दिनांक : 5 DEC 2023

## महत्वाची सुचना – 1

**विषय : शैक्षणिक वर्ष 2023-24 ला प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष प्रवेशित सर्व प्रवर्गाच्या विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिप/ई.बी.सी/इ.डब्ल्यु.एस/पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेचे अर्ज www.mahadbtmahait.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन भरुन सादर करणेबाबत.**

**संदर्भ : 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. 18/तंशिसं/डीबीटी/विकाप/2023-24/243, दिनांक 20/10/2023.**

**2. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी/पोर्टल/शिष्य./2023-24/3364, दिनांक 15/10/2023.**

शैक्षणिक वर्ष 2023-2024 ला प्रथम, व्दितीय, तृतीय चतुर्थ व थेट व्दितीय वर्ष (1,2,3,4 & DSY Year B.Tech) प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गाचे विदयार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती/फ्रिशिप/ई.बी.सी/इ.डब्ल्यु.एस/पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता/Minority योजनेचे अर्ज www.mahadbtmahait.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन रित्या भरून सादर करण्याची प्रक्रिया चालु आहे. सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, ज्या विदयार्थ्यांनी फी सवलत घेवुन महाविदयालयामध्ये प्रवेश घेतलेला आहे. अशा सर्व विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती सवलतीचा अर्ज **दिनांक 15/11/2023 ते 31/12/2023 या कालावधीत ऑनलाईन रीत्या सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती करीता www.mahadbtmahait.gov.in या वेबपोर्टलवर भेट दयावी.**

**महत्वाची सुचना :-**

1) महाविदयालयामध्ये प्रवेशावेळी वेगवेगळया प्रवर्गाच्या विदयार्थ्यांना शासनातर्फे शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजुर होत असल्यामुळे शुल्कामध्ये सवलत देवून या महाविदयालयामध्ये प्रवेश देण्यात येतो, अशा सर्व विदयार्थ्यांनी त्या त्या प्रवर्गाच्या शिष्यवृत्ती/फ्रिशीप मंजूर करणा-या सक्षम प्राधिकरणाकडे शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज प्रत्येक वर्षी ऑनलाईन रित्या विहीत मुदतीमध्ये भरुन सादर करणे अनिवार्य आहे. जे विदयार्थी दिलेल्या मुदतीत/सुचनेप्रमाणे अर्ज भरणार नाहीत. तसेच प्रवेशावेळी त्यांच्या शुल्कामध्ये जेवढी सवलत देण्यात आली आहे. तेवढी शिष्यवृत्ती/फ्रिशिप शासनातर्फे शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर करणा-या प्राधिकरणाने मंजूर न केल्यास उर्वरित सर्व रक्कम अशा विदयार्थ्यांकडुन वसुल करण्यात येईल. तसेच विहित मुदतीत फी सवलतीचे अर्ज दाखल केलेले असले तरी संबंधीत विभागामार्फत शिष्यवृत्ती/फ्रिशीप मंजूर न झाल्यास विदयार्थ्यांना पुर्ण शुल्क भरणे अनिवार्य राहील.



Scanned with OKEN Scanner

2) विदयार्थ्यांनी वेळोवेळी महाविदयालयातर्फे देण्यात येणा-या सुचनांचे अवलोकन करावे. तसेच शिष्यवृत्ती/फ्रिशिपच्या अर्जाला अंतीम मान्यता मिळेपर्यंत विदयार्थ्यांने आपण भरलेल्या अर्जाची सदस्थितीची पडताळणी करणे आवश्यक आहे. एखादया विदयार्थ्याचा अर्ज काही तृटीमुळे परत पाठविण्यात आल्यास व सदरचा अर्ज विदयार्थ्याने पुन्हा तृटीची पुर्तता करुन सादर न केल्यास शिष्यवृत्ती/फ्रिशिप विषयक होणा-या नुकसानास विदयार्थी तसेच पालक स्वत: जबाबदार राहतील.

3) कोणत्याही विदयार्थ्याला नियमानुसार शासनामार्फत दिल्या जाणा-या एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनेचा लाभ घेता येणार नाही. (उदा. Mahadbt तसेच NSP या दोन्ही पोर्टलवरील शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा एकावेळेस लाभ घेता येणार नाही.)

4) **ST/SC हे प्रवर्ग वगळुन** इतर सर्व प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांच्या पालकाची उत्पन्न मर्यादा 8 लाख पेक्षा जास्त असेल त्यांना कुठल्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षास पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

5) **TFWS** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने व्यतिरीक्त अन्य कुठलाही लाभ घेता येणार नाही. अन्य सवलतीस Apply केल्यास अर्ज रदद करण्यात येईल, तसेच रक्कम अदा झाल्यास वसुल करण्यात येईल.

6) **Against CAP (EWS)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना कोणत्याही शिष्यवृत्ती/फ्रिशिप चा लाभ घेता येणार नाही.

7) **Against CAP (ST/SC)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

8) **Against CAP (OBC/SBC/VJNT)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रबंधक,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचना विभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारे आपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.



Scanned with OKEN Scanner